# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :१२/२०२४/ अहिल्यानगर

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| ॲड. केशव साहेबराव राजेनिंबाळकर.<br>रा. निवारा बिल्डींग, सहयोग नगर,<br>मु.पो.ता.जि.बीड-४३११२२ | सहायक गट शिक्षणधिकारी,<br>शिक्षण विभाग, पंचायत समिती कार्यालय, जामखेड,<br>ता.जामखेड,जि.अहिल्यानगर. |

सुनावणी दिनांक १९/११/२०२५

तक्रारदार यांनी दिनांक ०८/०१/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९/११/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी विद्यमान, तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित असून, तक्रारदार अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक ०८/०१/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "विनंती अर्ज करतो कि आपण दिलेल्या निर्णयान्वये सदर प्रकरणी मला माहिता अथवा कोणताही पत्रव्यवहार सदर विभागाकडुन झाला नाही. तरी मा. आयुक्त माहिती यांनी सदर विभागावर कोर्टाचा अवमान केले बाबत रितसर कार्यवाही करुन मला माहिती मिळणेबाबत आदेशित करावे ही विनंती. [दंडात्मक कारवाई व नुकसान भरपाई मिळावी ही विनंती]"

३) तक्रारदार यांनी दिनांक १५/११/२०२० च्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

*"सन २०१० ते मिळेपर्यंतचा वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवाल (आपेक्ष पुर्तता नोंदवहीसह),आक्षेप पुर्तता केल्याची वर्षनिहाय पुराव्यानिशी माहिती तसेच वर्षनिहाय दप्तर तपासणी अहवाल यांची माहिती छायांकित साक्षांकित करुन मिळावी."*

४) आयोगाने व्दीतीय अपील क्र.३४३/२०२१/ अहमदनगर संदर्भात दिनांक १७/०४/२०२३ रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीअंती दिनांक ३०/१०/२०२३ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

*"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक गट शिक्षणधिकारी, पंचायत समिती, जामखेडा यांना आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली कार्यालयात उपलब्ध देय असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे तात्काळ विनामूल्य उपलब्ध करून दयावी जी माहिती उपलब्ध होऊ शकत नाही,त्याबाबतचे स्पष्ट कारण नमूद करून अपिलार्थीस लेखी कळवावे व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा."*

५)	सुनावणीपूर्वी तक्रारदार यांनी लेखी युक्तीवाद सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, आजच्या सुनावणी मधील सर्व केसेसबाबत मला प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही जनमाहिती अधिकारी यांनी माहिती मला पुरविली नाही / टाळाटाळ केली, सबब माझी विनंती आहे कि, माझ्या सर्व प्रकरणांमध्ये ( केसेस) तीस दिवसामध्ये मला माहिती देण्याचे मा. आयुक्त साहेब यांनी आदेशित करावे तसेच संबंधितांना शास्ती व मला केसनिहाय नुकसान भरपाई मिळावी ही नम्र विनंती.

६)	सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता तक्रारदार यांनी आयोगास सादर केलेल्या तक्रार अर्जात नेमक्या कोणत्या व्दितीय अपीलाच्या आदेशासंदर्भात त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. याबाबतचा कोणताही उल्लेख त्यांच्या तक्रार अर्जात तसेच सुनावणीपूर्वी त्यांनी आयोगास सादर केलेल्या लेखी युक्तीवादात केल्याचे दिसून येत नाही. तसेच कोणत्या माहिती अर्जासंदर्भात त्यांना माहिती मिळाली नाही याचादेखील उल्लेख त्यांनी त्यांच्या तक्रारअर्जात केल्याचे दिसून येत नाही.त्यामुळे त्यांनी आयोगास सादर केलेला तक्रार अर्ज मोघम स्वरुपाचा ठरतो. तसेच, प्रत्यक्ष सुनावणीवेळी तक्रारदार अनुपस्थित असल्याने त्यांनी आयोगास सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काहीही सिध्द केले नसल्याने, सदर तक्रार पुढील चौकशीयोग्य नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तूत तक्रार क्र. १२/२०२४/ अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. २७९८	02 APR 2026